लोकमत पुणे, रविवार, दि. ७ जानेवारी २०१८



जीवित नदी व सागर मित्रतर्फे आयोजित केलेल्या 'रिव्हर वॉक'ला उपस्थित विविध शाळांचे विद्यार्थी.

## जीवित नदी, सागर मित्रतर्फे आयोजन : मुठाईबाबतची जाणली माहिती

# पोवाड्यात नदीचा इतिहास!

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : पोवाड्यातून मुठाईचा इतिहास उलगडला आणि शिवरायांनी नदीचे केलेले संवर्धन आणि आजची नदीची झालेली अवस्था असा संपूर्ण इतिहासच सादर झाला. त्यामुळे उपस्थित विद्यार्थी भारावून गेले आणि त्यांनी नदीचे संवर्धन करण्याचा निर्धार केला.

निमित्त होते जीवित नदी व सागर मित्र यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेला 'रिव्हर वॉक'चे. या वेळी जीवित नदीचे अदिती देवधर, उमा खरे, मंजूश्री, शैलजा, मनीषा घोरपडे, अनुराधा कोडीलकर, ओमकार गानू व इतर सदस्य उपस्थित होते. या वेळी शाळांचे सुमारे ८०हून अधिक विद्यार्थी या वॉकमध्ये सहभागी झाले होते.

### स्वच्छतेचा संकल्प

- विद्यार्थ्यांनी या वेळी नदी पात्राची स्वच्छता केली. यापुढे आम्ही कचरा नदीत टाकणार नाही आणि टाकू देणार नाही, असा संकल्पदेखील या विद्यार्थ्यांनी केला.
- सध्या नदीची वाईट अवस्था झालेली आहे. नदी म्हणजे त्या गावाचे आरोग्य असते. नदीवरुनच शहराचे आरोग्य ठरत असते. परंतु, मुठाईचे सध्याचे रुप अत्यंत वाईट आहे. ही स्थिती पूर्वी शिवाजीमहाराजांच्या काळात नव्हती. तेव्हा महाराजांनी अत्यंत आपुलकीने या नदीचे संवर्धन केले होते. पण सध्याच्या नागरिकांना नदीचे महत्त्वच कळालेले नाही. त्यामुळे नदीपात्रात कचरा टाकून तिला घाण केले जात आहे. ही नदी स्वच्छ करण्याची जबाबदारी आपलीच असून, तिला जिवंत ठेवणे गरजेचे आहे, असा संदेश पोवाड्यातून देण्यात आला. तसेच उपस्थित विद्यार्थ्यांना मुठा नदीचा संपूर्ण इतिहास सांगण्यात आला. नदीचे महत्त्व, तिचे उगमस्थान, तिच्यामुळे शहराच्या आरोग्यावर कसा परिणाम होतो आदीबाबत माहिती देण्यात आली.



पोवाडा सादर करताना शाहीर.